दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १६० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 4 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 160 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### मी पक्षाध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही

**मुंबई–** प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी पक्षाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत आपण नसल्याचेही स्पष्ट केले. ते म्हणाले, पक्षाचा निर्णय योग्य पद्धतीनेच होईल. योग्य दिशेनेच होईल. योग्य व्यक्तीचाच होईल व माझ्याशिवायच होईल. आता याहून अधिक काय बोलू. आमच्याकडून एकही विधान आले नसताना उगीच या प्रकरणी वादळ निर्माण करणे व आमच्या पक्षामध्ये संशय निर्माण करणे ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. मला याविषयी अजिबात फार काही बोलायचे नाही. आम्ही या प्रकरणी योग्य तो निर्णय घेऊ, असे ते म्हणालेत. पत्रकारांनी यावेळी त्यांना तुम्ही अध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही का? असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी सकारात्मक उत्तर दिले.

# सुनेत्रा पवार यांचे राजकीय स्थान अधिक बळकट

## पुणे आणि बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्री म्हणून काम पाहणार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राज्य सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, सुनेत्रा पवार या पुणे आणि बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्री म्हणून काम पाहणार आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांच्याकडे दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांची धुरा देण्यात आल्याने प्रशासनातही याची चर्चा सुरू आहे.पुणे जिल्हा हा राज्यातील सर्वात मोठ्या आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी जिल्ह्यांपैकी एक मानला जातो, तर बीड जिल्हा मराठवाड्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आल्याने त्यांच्या भूमिकेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अजित पवार यांच्या कार्यशैलीचा वारसा पुढे नेत, जिल्हास्तरावरील विकासकामांना गती देण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त केली जात आहे. सरकारच्या या निर्णयामुळे सुनेत्रा पवार यांचे राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय स्थान अधिक बळकट झाल्याचे मानले जात आहे.

सुनेत्रा पवार यांच्याकडे पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली असून, यासंदर्भातील परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने जारी केले आहे. उपमुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर अर्थखाते वगळता अजित पवारांकडे असलेली इतर सर्व खाती सुनेत्रा पवार यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवली जाणार असल्याची माहिती प्रफुल पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेचे राजकीय महत्त्व आणखी वाढले आहे.पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे त्यांच्या हाती देण्यात आल्याची अधिकृत घोषणा शासनाकडून करण्यात आली. दरम्यान, सुनेत्रा पवार ९ फेब्रुवारी रोजी मंत्रालयातील कार्यालयात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार मंत्रालयातून राज्यभरातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत असत, त्याच पद्धतीने सुनेत्रा पवारही कामकाज पाहतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीसह बीड जिल्ह्यातही बंद पाळण्यात आला होता. बारामती हे त्यांचे कार्यक्षेत्र आणि जन्मभूमी असल्याने स्थानिकांनी स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून शोक व्यक्त केला. त्याचप्रमाणे बीडमध्येही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत श्रद्धांजली वाहिली. गेल्या काही महिन्यांत बीडचे पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी जिल्ह्यातील जनतेशी जवळीक साधली होती. त्यांच्या कामाच्या शैलीमुळे बीडकरांमध्ये त्यांच्याविषयी आत्मीयता निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर बीडमध्ये उमटलेली प्रतिक्रिया लक्षवेधी ठरली. आता त्या जिल्ह्याच्या पालकत्त्वाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे येत असल्याने त्या नात्याची सातत्याने जपणूक होणार का, याकडेही लक्ष लागले आहे.



### दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांची धुरा हाती

**दरम्यान, बीडमधील संतोष देशमुख हत्याप्रकरणात मुख्य आरोपी वाल्मिक कराड याच्याशी निकटचे संबंध असल्याच्या आरोपांमुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर बीडचे पालकमंत्रीपद अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आले होते. आता त्यांच्या पश्चात ही जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे आली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील प्रशासन, कायदा-सुव्यवस्था आणि विकासकामांच्या संदर्भात सुनेत्रा पवार कोणती दिशा देतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे. पुणे आणि बीड या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांची धुरा त्यांच्या हाती देत सरकारने स्पष्ट संदेश दिला आहे की, अजित पवारांच्या वारशाची राजकीय आणि प्रशासकीय सातत्याने पुढे नेण्याची भूमिका सुनेत्रा पवार निभावतील.**

## नंदुरबार-सुरत मेमोची वेळ बदलून ५:३० करण्याची मागणी

### शिवसेना (उबाठा) गटाचे रेल्वे प्रशासनाला निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**




नंदुरबार रेल्वे स्थानकावरून सकाळी ५ वाजता सुटणाऱ्या नंदुरबार-सुरत मेमो ट्रेनच्या वेळेत बदल करून ती सकाळी ५:३० वाजता सोडण्यात यावी, या मागणीचे निवेदन नुकतेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने रेल्वे प्रशासनाला देण्यात आले. प्रवाशांची सोय आणि रेल्वेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने हा बदल अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या ही मेमो ट्रेन ५ वाजता सुटते, परंतु मागून येणाऱ्या हावडा आणि बरौनी एक्सप्रेस सारख्या सुपरफास्ट गाड्यांना मार्ग मोकळा करून देण्यासाठी मेमो ट्रेनला कोळदा आणि नवापूर स्थानकांवर बराच वेळ थांबवून ठेवले जाते. यामुळे प्रवाशांचा वेळ वाया जातो. त्याऐवजी, जर मेमो ट्रेन नंदुरबारहूनच २० ते २५ मिनिटे उशिराने (५:३० वाजता) सोडली, तर प्रवाशांना स्थानकावर ताटकळत राहावे लागणार नाही.ग्रामीण भागातून येणाऱ्या एस.टी. साध्या बसेस सकाळी ५ वाजेच्या सुमारास नंदुरबार स्थानकावर पोहोचतात. मेमोची वेळ ५:३० केल्यास या ग्रामीण प्रवाशांनाही ही ट्रेन पकडणे सोयीचे होईल. यामुळे हावडा आणि बरौनी एक्सप्रेसमधील प्रवाशांची गर्दी कमी होण्यास मदत होईल. प्रवाशांची संख्या वाढल्यामुळे रेल्वेच्या उत्पन्नातही भर पडेल. हे निवेदन देताना शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हा प्रमुख पंडित माळी, अल्पसंख्याक विभागाचे उपजिल्हाप्रमुख इम्तियाज कुरेशी, युवा शहर प्रमुख शेखर जाधव, खंडू माळी, वसीम खान, इम्तियाज खान, कुणाल पवार, राजेश पवार, नैतिक करम आणि इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदुरबारच्या युवा हॉकीपटूंना साहित्याचे पाठबळ; १० राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



जिल्ह्यातील हॉकी खेळाला उभारी देण्यासाठी आणि उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालयाने पुढाकार घेतला आहे. जिल्हा क्रीडा हॉकी प्रशिक्षण केंद्राच्या वतीने प्रशिक्षणार्थी खेळाडूंना मोफत क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या १० खेळाडूंचा विशेष सत्कारही करण्यात आला.

जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. खेळाडूंच्या सरावात खंड पडू नये आणि त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, यासाठी हॉकी स्टिक, हॉकी बॉल, अद्ययावत गोलकीपर किट आणि दर्जेदार स्पोर्ट्स शूज अशा साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सुनंदा पाटील यांनी राज्यस्तरावर पदक मिळविणाऱ्या मुलींच्या संघाचे विशेष अभिनंदन केले. तसेच, राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या १० गुणवंत खेळाडूंचा सत्कार करताना त्या म्हणाल्या, जिल्ह्यातील खेळाडूंची सातत्यपूर्ण मेहनत आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. या कामगिरीचा जिल्ह्याला अभिमान आहे. नंदुरबार जिल्ह्यात हॉकीचे दर्जेदार प्रशिक्षण दोन ठिकाणी उपलब्ध आहे: जिल्हा क्रीडा संकुल, नंदुरबार. शासकीय इंग्रजी माध्यमिक आश्रम शाळा, नंदुरबार. राज्य क्रीडा मार्गदर्शक भगवान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली येथे नियमित सराव घेतला जातो. अधिकाधिक शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या केंद्रात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास तालुका क्रीडा अधिकारी महेश पाटील, क्रीडा अधिकारी ओंकार जाधव, संजय बेलोरकर, भगवान पवार, तसेच क्रीडा कार्यालयाचे मुकेश बारी, कल्पेश बोरसे, दिगंबर चौधरी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वादळी कट्टा

कागदावर वस्तीगृह, भिंतींवर धुळीचा थर,
बोगस नावांच्या जोरावर उचलला सगळा भर.
गरिबांची झोप रस्त्यावर, हिशोबात गादीदार,
हंगामी योजनेचा खेळ झाला कायमचा व्यापार.

हंगाम आला-गेला तरी वस्तीगृह दिसेना,
हजेरी बुक भरलेली, विद्यार्थी मात्र भेटेना.
खोली रिकामी, रजिस्टर जड, सही मात्र भारी,
बोगस व्यवस्थेने लुटली गरिबांची शिदोरी सारी.

आश्रयासाठी योजना, हेतू होता पवित्र,
पण दलालांच्या हातात पडली तीच व्यवस्था विचित्र.
ज्यांच्यासाठी उभारल्या भिंती कागदावर भारी,
ते अजूनही उघड्यावर, हिशोब मात्र साजिरी.
शासनाचा पैसा वाहतो कागदाच्या भ्रष्ट वाटेवर,
नोंदींमधली वस्तीगृहं श्रीमंत, गरिबी मात्र बाहेर.
बोगस हंगामी वस्तीगृहांची उघडी पडते थाटाची फसवणूक बाहेर,
न्याय येईल तो दिवसच सांगेल कोण आतअन् कोण कायमचा बाहेर.

**संपादक**
**अजय भांगे**



## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा उत्साहात निरोप समारंभ

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**




देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि. ३१ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर होत्या. यावेळी उपप्राचार्य सय्यद सिद्धीक यांच्यासह शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. यावेळी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्येष्ठ विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण उत्साहपूर्ण केले.प्राचार्या उमा जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीची परीक्षा हा केवळ एक टप्पा असून जीवनात मोठी ध्येये निश्चित करा. संकटांना धैर्याने सामोरे जात शाळेचे नाव उज्ज्वल करा. यावेळी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना परीक्षेचा तणाव दूर ठेवून वेळेचे योग्य नियोजन करण्याचे मार्गदर्शन केले.निरोप समारंभाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेत टाकलेल्या पहिल्या पावलापासून शिक्षकांचे प्रेमळ मार्गदर्शन आणि मित्र-मैत्रिणींसोबत डबा शेअर करत घालवलेल्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला मुंडे यांनी केले, तर आभार वर्षा जावळे यांनी मानले.

## धक्कादायक..! चौथीच्या निरागस विद्यार्थ्याने गळफास घेऊन संपवले जीवन

दैनिक वादळ वार्ता
**आरमोरी । प्रतिनिधी**



तालुक्यातील कोजबी गावात एका निरागस बालकाच्या जाण्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. जिल्हा परिषद शाळेत इयत्ता चौथीत शिकणारा दहा वर्षांचा संस्कार विनोद कन्नाके हा लहान मुलगा याने १ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३० च्या सुमारास आपल्या छोट्याशा घरात गळफास घेऊन प्राणोत्सर्ग केला. या घटनेने कोजबी गावासह संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संस्कारचे आई-वडील मजुरीसाठी तेलंगाणा राज्यात गेले असताना हे लहान मूल एकटे घरी होते. शाळेतून घरी परतल्यावर काय त्रास झाला, काय व्यथा मनात होती, हे सांगणारा कोणी नव्हता. फक्त एक छोटासा दोरीचा फास आणि शांत झोपलेला निरागस देह,ही दृश्य पाहून प्रत्येकाचे हृदय विदीर्ण होत आहे. कोजबी येथील पोलीस पाटील माधुरी सहारे यांनी भ्रमणध्वनीद्वारे या घटनेची माहिती दिल्यानंतर आरमोरी पोलीस स्टेशनचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धावले. पोलिसांनी पंचनामा करून संस्कारचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय, आरमोरी येथे पाठवला आहे. सदर आत्महत्येचे नेमके कारण अद्याप गूढच आहे. शाळेत काही त्रास झाला का? एकटेपणाच्या ओझ्याने मन दुखले का? की घरची आर्थिक कोंडी याने लहान मनात निराशा निर्माण झाली? हे सगळे प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलीस अधिक तपास करीत असून, उत्तरीय अहवालानंतरच खरी कारण समोर येईल. मात्र, या घटनेने कोजबी गावातील प्रत्येकाच्या मनात प्रश्न उपस्थित केले आहेत.

# संपादकीय

## भयमुक्त परीक्षा

फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांना भयमुक्त व आत्मविश्वासपूर्ण वातावरण मिळणे गरजेचे आहे. अभ्यास, योग्य मार्गदर्शन, पालक–शिक्षकांचा सकारात्मक सहभाग आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समतोल साधल्यास विद्यार्थी निर्धास्तपणे परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करतील.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते. खोडकर मित्रांचा नाद सोडून चांगल्या मित्रांच्या सहवासात राहावे. मोबाईलला चार हात दूर ठेवावे. आवश्यक कामासाठी मोबाईलचा वापर करावा. याचा परिणाम परीक्षेची तयारी झाल्याने विद्यार्थी हसत हसत आनंदाने परीक्षेला जातात. बरेच विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा केल्याने परीक्षेच्या कालावधीत मानसिक तणावाखाली दिसतात. याचा परिणाम आपण काय करावे काय करू नये याचा विचार करीत विद्यार्थी असतात. अशावेळी त्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी किंवा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे गरजेचे आहे. परीक्षेपूर्वी प्रत्येक विद्यालयांनी किंवा एकत्रितपणे मानसोपचार तज्ज्ञांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात यावेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होते.दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. या दोन्ही परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या भयातून मुक्त करायला हवे. हेच विद्यार्थी देशाचे सुजाण नागरिक बनणार आहेत. वर्ष, महिने आणि आता काही दिवस परीक्षेला शिल्लक राहिले आहेत. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची दिशा या परीक्षांवर अवलंबून असते. आता बारावीच्या परीक्षेला १० दिवस आणि दहावीच्या परीक्षेला २० दिवस आहेत. वर्षभर आपण काय केले? किती तास अभ्यास केला? मार्गदर्शक कोण होते? गंमती जंमती काय केल्या? हे सर्व बाजूला ठेवावे. विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचा विचार करून परीक्षेचे वेळापत्रक डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाची उजळणी करावी. त्याचप्रमाणे लिहिण्याचा सरावही नियमित करावा. आतापर्यंत आपल्याला प्रत्येक विषयात किती गुण मिळाले याची चर्चा करू नये. आता एकच लक्ष अंतिम परीक्षा. दिलेल्या वेळेत विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे लिहिणे. ती सुद्धा उत्तरपत्रिकेत खाडाखोड न करता. मनामध्ये कोणत्याही प्रकारचे दडपण न घेता. प्रश्नाच्या उत्तराच्या महत्त्वाच्या वाक्याखाली लाईन मारणे. प्रश्न नवीन पानावर सोडविणे. याची पूर्व सूचना शाळा सुरू झाल्यावर प्रश्नाचे उत्तर कसे लिहावे. प्रश्नपत्रिका कशी सोडवावी याविषयी अध्यापकांनी ज्या सूचना दिल्या असतील त्याचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही प्रकारचे दडपण घेऊ नये. मन प्रसन्न ठेवून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या वेळेत लिहून पूर्ण करावीत. परीक्षेच्या कालावधीत भीतीविरहित विद्यार्थ्यांच्या मनात वातावरण निर्माण केले पाहिजे. यासाठी परीक्षेच्या कार्यकाळात वातावरण निर्मिती अतिशय महत्त्वाची असते. तरच विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला भयमुक्त परीक्षेला सामोरे जाऊन परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करू शकतात.

# ठाण्यातील कोपरी परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**ठाणे** । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेली सर्वंकष स्वच्छता मोहिम नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या नेतृत्वाखाली आज नौपाडा कोपरी प्रभागसमिती अंतर्गत येत असलेल्या कोपरी परिसरात व्यापक प्रमाणात राबविण्यात आली. सकाळी ७.३० वा.अष्टविनायक चौकातून स्वच्छतेची शपथ घेवून या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. कर्तव्य आज, मग पदाचा चार्ज असे नमूद करीत उपमुख्यमंत्र्यांनी सुरू केलेली ही मोहिम संपूर्ण ठाणे शहरात अधिक व्यापक प्रमाणात राबविणार असून या मोहिमेत ठाणेकरांचेही सहकार्य आवश्यक असल्याचे नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले.या सर्वंकष स्वच्छता मोहिमेस नगरसेवक मालती पाटील, नम्रता पमनानी, भरत चव्हाण, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त मधुकर बोडके, दीपक झिंजाड, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगरअभियंता विकास ढोले, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, मुख्य स्वच्छता निरीक्षक शंभूराज कांबळे, मयुरी वखारिया, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी, चारू घुट्टे आदी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अष्टविनायक चौकातून या मोहिमेस प्रारंभ



झाला, त्यानंतर कोपरी गाव, कन्हैया नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच बारा बंगला या भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कचरा संकलन व साफसफाईबरोबरच रस्ते पाण्याने स्वच्छ करण्यात आले. यासाठी (एसटीपी) प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करण्यात आला. या मोहिमेत नागरिक देखील उत्सफूर्तपणे सहभागी झाले होते. पिपल्स एज्युकेशन सोसायटी स्कूल, नानीक इंग्लिश स्कूल, श्री मा बालनिकेतन, विद्यासागर एज्युकेशन सोसायटी, जीवन ज्योती इंग्लिश मीडियम, इत्यादी शाळेचे शिक्षक व प्रत्येक शाळेचे ५० विद्यार्थी स्वच्छता अभियान मध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी सहभागी होते. तसेच उद्यान विभाग, पाणीपुरवठा, बांधकाम शिक्षण, अतिक्रमण, मलनिसारण विभाग व इतर विभाग सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी हातात फलक घेत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत तसेच ओला कचरा, सुका कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती केली. स्वच्छ सुंदर ठाणे ..हाच करुया निर्धार रे' च्या घोषणा यावेळी विद्यार्थ्यांनी दिल्या. या मोहिमेसाठी जेटिंग गाडी, पाण्याचे टँकर, सीएनडीच्या २ गाड्या, जेसीबी डंपर तसेच कचरा उचलण्यासाठी ३ आरसी कॉम्पॅक्ट १० घंटा गाड्याचा वापर करण्यात आला. या मोहिमेसाठी जवळपास ७०० सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# जासई मतदारसंघात महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा जल्लोष

### जासई जिल्हा परिषद गटातील उमेदवार डॉ.मनिष पाटील पं.स.उमेदवार सौ.निर्मला नरेश घरत व सौ.प्रियंका दिपक मढवी यांचा विजय निश्चित–मनोहर भोईर

दैनिक वादळ वार्ता

**उरण** । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, जासई जिल्हा परिषद गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. मनीष अनंत पाटील व जासई पंचायत समिती गणातील महाविकास आघाडीच्या उमेदवार निर्मला नरेश घरत यांचा जासई धुतुम, करळ, सोनारी,सावरखार, वेश्वी,चिर्ले,दिघोडे,विंधणे ग्रामपंचायतींच्या विविध गावांसह रानसई ग्रामपंचायत आदिवासी वाड्या परिसरात प्रचाराचा झंझावात सुरू असून, घर टू घर जाऊन उमेदवार व कार्यकर्ते प्रचार पत्रकाचे वाटप करत आहेत. प्रत्येक गावागावात उमेदवारांचे जल्लोषात स्वागत होत आहे. मतदार संघातील मतदार हे जागृत मतदार आहेत. महाआघाडीला मत म्हणजे विकासाला मत त्यामुळे जासई जिल्हा परिषद गटात व चिर्ले



पंचायत समिती गणात महा विकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचारात निर्णायक आघाडी घेतली आहे. दरम्यान तालुक्यातील सोनारी,करळ ,सावरखार,धुतुम,जासई सह अनेक गावांध्ये रविवारी या जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या या उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात झाली. यावेळी उमेदवारांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी नागरिकांबरोबर संवाद साधून, हाताचा पंजा व खटारा चिन्हा समोरील बटन दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. प्रचारात महिला, तरुण मंडळी, जेष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून आला. प्रचारात डॉ.मनीष पाटील व निर्मला नरेश घरत व प्रियांका मढवी यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. यावेळी काँग्रेसचे महेंद्र घरत,शिवसेना माजी आमदार मनोहर भोईर, जासई विभाग अध्यक्ष विनोद पाटील, प्रेमनाथ ठाकूर, जासईचे सरपंच संतोष घरत, कंठवलीचे जयराम पाटील, भेंड भेंडखळचे दिपक ठाकूर, रोहिदास पाटील, मेघश्याम कडू, दिनेश कडू, दिनेश पाटील, नारायण तांडेल ,किशोर कडू, रमाकांत कडू ,दत्ता कडू, कमलाकर पाटील, किशोर कडू, शेखर कडू, अविनाश कडू प्रवीण कडू ,सुनील कडू, विराज कडू, सूचित कडू, प्रमोद पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद पाटील, तुकाराम कडू, अशोक,कडू,दिनेश तांडेल,मुन्ना तांडेल केशव तांडेल,प्रकाश तांडेल,विश्वास तांडेल,प्रतीक कडू,भूषण कडू,संदीप तांडेल,दिनेश ठाकूर,विद्याधर ठाकूर नरेश तांडेल.डि.के.कडू, सुजाता कडू.शंकर तांडेल,मंगेश तांडेल,अंकुश तांडेल. यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दशबल पहाडी येथे माघ पौर्णिमा वर्धापन दिनानिमित्त बौद्ध धम्म परिषद संपन्न

### मानसिक शांतता व दुःखातून मुक्ती मिळवण्यासाठी धम्म आचरणात आणने आवश्यक–भिक्खु कुसलामुनी बौद्धगया

दैनिक वादळ वार्ता

**भंडारा** । प्रतिनिधी

दशबल पहाडी भिक्खू संघ, सितेपार / हत्तीडोई ता. जि. भंडारा यांच्या वतीने माघ पौर्णिमा वर्धापन दिनानिमित्त आयोजित ३२ व्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन दि. ०१ फेब्रुवारी २०२६, रविवार रोजी दशबल पहाडी परिसर, सितेपार / हत्तीडोई येथे मोठ्या उत्साहात पार पडले. बुद्धकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या दशबल पहाडी परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा, तसेच संपूर्ण मानवजातीला शांती, समता व करुणेचा संदेश देणाऱ्या महाकारुणिक तथागत गौतम बुद्धांच्या धम्माचा प्रचार व प्रसार व्हावा, या उदात्त उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेत भिक्खूनी संघप्रिया महाथेरी, भिक्खू धम्मज्योती, भदंत सुगतबोधी महाथेरो, भिक्खू शिलरतन, भिक्खू मैत्रय, भिक्खूनी सुप्रज्ञा, भिक्खूनी आम्रपाली तसेच इतर भिक्खू–भिक्खूनी संघ यांनी उपस्थित अनुयायांना धम्मदेशना करत बुद्ध धम्माचा मार्ग, नैतिक जीवनमूल्ये आणि सामाजिक समतेचे महत्त्व विशद केले. प्रत्येक अनुयायांनी धम्म आचरणात आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. धम्म आचरणात आणले तर मानसिक शांतता आणि खरा आनंद मिळतो, दुःखातून मुक्ती व आत्मज्ञान मिळण्यास मदत होते, माणूस विकारांपासून मुक्त होऊन सदाचारी बनतो. थोडक्यात, धम्म म्हणजे केवळ पूजा–पाठ नसून, कृतीतून सत्य आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारणे होय असा उपदेश भिक्खु कुसलामुनी बौद्ध गया बिहार यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन भिक्खु कुसलामुनी बौद्ध गया बिहार यांच्या अध्यक्षतेखाली रोषणभाऊ जांभुळकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अमृत बन्सोड यांनी दशबल पहाडीची ऐतिहासिक पार्श्वभूमी सविस्तरपणे मांडून या परिसराच्या प्राचीन वारशाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास व्ही. एस. चुरहे (कार्यकारी अभियंता, जि. प. भंडारा), प्यारेलालभाऊ वाघमारे (माजी जि. प. सदस्य), प्रा. प्रियदर्शन सोनटक्के, सूर्यभान हुमने, श्रीकृष्ण देशभ्रतार, प्रा. डॉ. शिलवंतकुमार मडामे, शिवदास वहाने, सौ. अलका रंगारी, सौ. वैशाली चव्हाण, डॉ. रतनकुमार गेडाम, सिद्धार्थ गजभिये, दिनेश वासनिक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. समता सैनिक दल च्या वतीने बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान लहान मुला–मुलींनी बुद्ध–भीम गीतांवर सादर केलेल्या उत्स्फूर्त नृत्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले, तर त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. तसेच कलावंत शिवदासजी वहाने यांनी आपल्या सुमधुर गायनातून श्रोत्यांची मने जिंकली. या कार्यक्रमास बहुसंख्य अनुयायी व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन दिनेश कांबळे सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मदनपाल गोस्वामी यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन भिक्खूनी संघप्रिया व डॉ. देवानंद नंदागवळी यांनी केले.







# उकरून पंचायत समिती गणातील मनसेच्या उमेदवार प्रिंयाका जितेंद्र पाटील यांना मतदारांचा वाढता पाठिंबा

दैनिक वादळ वार्ता

**कर्जत** । प्रतिनिधी

कर्जत तालुक्यांत सुरु असणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत मनसेकडून जोरदार शक्तिप्रदर्शन सुरु असल्यामुळे शिवसेना व परिवर्तन विकास आघाडीच्या समोर कठिण राजकीय प्रसंग उभा राहिला आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील होत असलेल्या निवडणुका दिवसेंदिवस मोठ्या प्रतिष्ठेच्या ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या दोन्ही राजकीय गटांमुळे सध्या मनसेचे रेल्वे इंजिन सुसाट धावत असून प्रचारात आघाडी घेतली असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे याच अनुषंगाने उकरुळ पंचायत समितीच्या उमेदवार प्रियांका जितेंद्र पाटील या मनसेकडून रेल्वे इंजिन निशाणी घेऊन स्वबळावर या निवडणूकीत आपले नशीब आजमावत असल्यामुळे मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी आपले विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

माणगाव तर्फे वरेडी जिल्हा परिषद



गटातील उकरुळ पंचायत समिती गणाच्या मनसेच्या उमेदवार प्रियांका जितेंद्र पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ झाल्यापासून संपूर्ण पंचायत समिती गणातील पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या उत्साहात या प्रचार दौऱ्यात सामील होत आहेत. त्यामुळे मनसेचे रेल्वे इंजिन कर्जत रेल्वे पट्ट्यात सुसाट वेगाने धावत असून राजकीय संघटनात्मक ताकद पाटील यांच्या यांच्या मागे उभी असल्यामुळे या निवडणुकीत त्या मोठ्या मताधिक्याने पुढे येतील असा अंदाज राजकीय वर्तुळातून व्यक्त होताना दिसत आहे.तर या पंचायत समिती गणातील विविध ग्रामपंचायत क्षेत्रातून त्यांना मिळत असणारा भरभरून प्रतिसाद हा मनसेच्या कार्यकर्त्यांना बळ देणारा ठरत असल्यामुळे या प्रभागातून मनसेच्या उमेदवार प्रियांका जितेंद्र पाटील यांना आशाणे ,किरवली, पुलाचीवाडी, उकरुळ ,गारपोली येथून मतदारांचा मिळत असणारा प्रचंड वाढता पाठिंबा कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या उत्साहात या प्रचार दौऱ्यात सामील होत असल्याने तेथे प्रचारात आघाडी घेतली असल्याचे चित्र आहे.या प्रभागातून मनसेचे सुशिक्षित उमेदवार प्रियंका पाटील यांना गावोगावी मतदारांचा मिळत असणारा प्रचंड वाढता पाठिंबा कार्यकर्ते विजयापर्यंत घेऊन जातील असा विश्वास मनसेचे नेते व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त होताना दिसत आहे त्यामुळे मनसेचे उमेदवार या ग्रामपंचायत क्षेत्रातून मोठे मताधिक्य येथील अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा अर्थसंकल्प-मुख्यमंत्री फडणवीसांकडून कौतुक

## बजेटमध्ये महाराष्ट्रासाठी २ कॉरिडॉर मिळाले



**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत सलग नववे केंद्रीय बजेट सादर केले. ८५ मिनिटांच्या या भाषणात 'विकसित भारत' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पाचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले असून, हा अर्थसंकल्प विकसित भारताकडे टाकलेले एक दमदार पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. तसेच हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. त्यांचे बजेट भाषण ८५ मिनिटांचे होते. यावर्षीच्या बजेटनुसार, देशभरात ७ हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि ३ आयुर्वेदिक एम्स बांधले जाणार आहेत. याचबरोबर, कर्करोगाच्या १७ औषधांवरील कस्टम ड्युटी रद्द करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणार्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल, असे फडणवीस म्हणाले.मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबसाठी होणार आहे, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.अर्थसंकल्पात राज्याला काय काय मिळाले, याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले, विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते अर्थसंकल्पानंतर माध्यमांशी बोलत होते.लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणार्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबसाठी होणार आहे, अशी माहितीही देवेंद्र फडणवीस यांनी दिली.अर्थसंकल्पाचा महाराष्ट्राला मोठा फायदा होणार आहे. विकसीत भारताकडे नेहणारे हे बजेट आहे. औद्योगिक सवलतीमुळे फोठा फायदा होणार आहे. उद्योग गुंतवणुकीचा आपल्याला फायदा होणार आहे. रेल्वे कोरिडॉरमुळे मुंबई आणि पुणे या दोन शहरातील प्रवास अधिक वेगवान होणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

---

### अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माझ्याशी बोलायचे

# आम्हाला न सांगता विलीनीकरणाची चर्चा करतील का?-देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेने राज्याच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण केले आहे. दोन्ही पक्ष १२ फेब्रुवारीला एकत्र येणार होते, या शरद पवार आणि जयंत पाटील यांचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोडून काढला आहे. अजित पवार भाजपशी चर्चा केल्याशिवाय विलीनीकरणाचा निर्णय घेतील का? असा थेट सवाल करत, राष्ट्रवादीने असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भाजपशी चर्चा करणे आवश्यक असल्याची 'अट' मुख्यमंत्र्यांनी घातली आहे.



शरद पवार गटाकडून असा दावा केला जात आहे की, अजित पवार स्वतः विलीनीकरणासाठी आग्रही होते आणि त्यासाठी अनेक गुप्त बैठकाही झाल्या होत्या. यावर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जर चर्चा अंतिम टप्प्यात असती आणि १२ फेब्रुवारी ही तारीख निश्चित झाली असती, तर अजितदादांनी आम्हाला नक्कीच कळवले असते. अशा कोणत्याही तारखेची माहिती आम्हाला नाही. अजित पवार आणि मी तासनतास चर्चा करत बसलो होतो. अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माझ्याशी बोलायचे. पण त्यांनी विलीनीकरणाबाबत असा कोणताही शब्द काढला नाही.मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी एक महत्त्वाचा तांत्रिक प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, अजित पवार अशी चर्चा करत होते, तर ते सरकारमधून बाहेर पडण्यासाठी करत होते का? मी यावर अनेक गोष्टी सांगू शकतो, पण सध्या मला त्यावर बोलायचे नाही.सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीमध्ये सत्तेत आहे, तर शरद पवारांची राष्ट्रवादी विरोधात आहे. अशा स्थितीत विलीनीकरण झाले तर सत्तेचे समीकरण बदलू शकते, याकडेच मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सुनेत्रा वहिनींनी पक्षाचे नेतृत्व करावे हा त्यांचा अंतर्गत निर्णय आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतलेल्या या निर्णयासोबत खंबीरपणे उभे राहणे हे महायुतीचा धर्म म्हणून आमचे काम आहे.दरम्यान, अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनीही याआधी शरद पवार गटाचा दावा खोडून काढला आहे. बारामती येथे झालेली बैठक ही विलीनीकरणासाठी नव्हती, तर केवळ जिल्हा परिषद निवडणुका एकत्र लढवण्याबाबत होती, असे सांगत त्यांनी शरद पवारांचा एकत्रीकरणाचा दावा फेटाळून लावला आहे. यामुळे दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी विधाने समोर येत आहेत.

---

### अजितदादांचा तेरावा झाल्यावरच राजकीय चर्चा

# सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल माहित नव्हते-रोहित पवार बोलले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. विशेषतः राष्ट्रवादी पक्षात व पवार कुटुंबात देखील अनेक हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे. परंतु, या सगळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार सावध भूमिका घेताना दिसत आहे. तसेच त्यांनी अजितदादांचा तेरावा होईपर्यंत कुठलेही राजकीय भाष्य करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.रोहित पवार म्हणाले, अजितदादांची बातमी आपण ऐकली, बातमी खरी आहे का स्वप्न आहे हे आम्हालाही कळत नाही. आजपर्यंत आम्ही त्या दुःखात आहोत, त्या विमानात आणखी जे होते त्यांचाही परिवार दुःखात आहे. काही दिवसांपूर्वी कळले की, दिंडोरी तालुक्यातील सुदाम बोडके हे अजित दादांचे आणि साहेबांचे कट्टर कार्यकर्ते आहेत. जेव्हा त्यांना अजित दादांच्या निधनाची बातमी कळली, तेव्हा अस्वस्थ झाले नंतर ते हॉस्पिटलमध्ये गेले आणि हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. आज पवार परिवार आणि हा परिवार दुःखात आहे. त्यामुळे मी बोडके कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, असे रोहित पवार म्हणाले.



पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, तेरावा ज्या दिवशी होईल, त्या दिवशी मी पत्रकार परिषद घेऊन सांगेल, आता राजकीय बोलणे योग्य नाही. दादांसोबत काय चर्चा झाली, सगळ्या प्रक्रियेत मी होतो. मात्र तेरा दिवसांनी सांगेल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे व्हारल व्हिडिओमध्ये रोहित पवार आणि अजित पवारांचे काय बोलणे झाले, याबाबत त्यांनी बोलणे टाळले आहे.सुनेत्रा पवारांच्या शपथविधी संदर्भात विचारले असता रोहित पवारांनी परखड मत मांडले आहे. ते म्हणाले, अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री पदाबाबत निर्णय घेताना पक्षाचे सुनील तटकरे, धनंजय मुंडे, छगन भुजबळ आणि प्रफुल्ल पटेल होते. या नेत्यांची सुनेत्रा काकी यांच्याशी चर्चा झाली असेल, राजकारणात अनुभव कमी असला तरी त्या अनेक वर्षांपासून समाजकारणात काम करतात.तसेच शपथविधी होणार असल्याचे आम्हाला कोणालाही माहित नसल्याचे रोहित पवारांनी म्हटले आहे. लाखो लोक बारामतीमध्ये पवार कुटुंबाला भेटण्यासाठी येत होते. पार्थ देखील होता. संपूर्ण महाराष्ट्र येऊन भेटत नाही, सांत्वन करत नाही तोपर्यंत आपण बारामतीत थांबले पाहिजे. आम्हाला शपथविधीची बातमी देखील टीव्हीच्या माध्यमातून समजली, असे रोहित पवारांनी स्पष्ट केले आहे.

---

# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया,जिल्हा शाखा यवतमाळ तर्फे तिन दिवसीय पाली भाषा व सुत्तपाठ प्रशिक्षण शिबिर संपन्न

### आदरणीय गुरुजी दिनेश मेश्राम (मध्यप्रदेश) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण पूर्ण

दैनिक वादळ वार्ता
**यवतमाळ । प्रतिनिधी**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने आयोजित तिन दिवसीय पाली भाषा व सुत्तपाठ प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन पिंपळगाव रोडलगत नव्याने उभारण्यात आलेल्या विहारमध्ये संपन्न झाले. या शिबिरात एकूण ७५ उपासक व उपासिका सहभागी झाले.या प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदरणीय गुरुजी दिनेशजी मेश्राम, बालाघाट (मध्यप्रदेश) यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य पदावरून मुक्त झाल्यानंतर त्यांनी विपश्यना केंद्राची उभारणी करून धम्म प्रसारासाठी घेतलेली पुढाकार व पाली भाषेतील सुत्तपाठ शिक्षणाची दिशा ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्यपूर्ण बाब ठरली आहे.शिबिराचे उद्घाटन दि. २९ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. उद्घाटक म्हणून आद. रवी भगत (चेअरमन, विहार बांधकाम समिती, यवतमाळ) यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या प्रसंगी रंजना ताकसांडे, मधुकर भैसारे, गौतम कुंभारे यांची प्रमुख उपस्थिती होती.




स्वागत सत्कारानंतर गुरुजी दिनेशजी मेश्राम यांच्या प्रेरणादायी वाणीने तीन दिवस चाललेल्या सुत्त पठण प्रशिक्षणास प्रारंभ झाला. या प्रशिक्षणातून पाली भाषेचे व धम्मसूत्त पठणाचे सखोल ज्ञान सहभागी उपासक-उपासिकांना मिळाले.या कार्यक्रमाच्या आयोजनात व समन्वयात सुनील बोरकर, मधुकर भैसारे, राजेश जांभुळकर, गौतम कुंभारे, सर्वदास मून, मनोहर पाटील, भारशंकर घनश्याम, सुनीता डी. मेश्राम, अरुण ढबाले, गणेश पाटील, प्रमोद रंगारी, सिद्धार्थ बनसोड, सुनंदा बनसोड, रंजना ताकसांडे, विजय रंगारी, संजय ढोले, विद्या ढोले, विना वाहुळे, विश्वास वाहुळे, कुमुद बुटले, नीलध्वज कांबळे, अरुण खंडारे, उषा खंडारे, विजया सिसाले, प्रतिभा रामटेके, प्रमिला भगत, सारिका रामटेके, कुसुम पाटील, आशा मुनेश्वर, अमरगंधा सुखदेवे, धम्मवती वासनिक, माया मेश्राम, शिल्पा मेश्राम, रचना मेश्राम, सुनीता मेश्राम (नागपूर), प्रभा अडागळे, बळीराम अडागळे, छाया भगत, डॉ. भगत, विमल रामटेके, हरिदास दुबे, प्रमिला पाटील, चंदू मेश्राम, मालती पाटील, लतिका मेश्राम, सुमती खंडारे, समीक्षा भरणे, यशोमित्रा शंभरकर, अरुणा शंभरकर, सुजाता भानसे, सरोज चांदणखेडे, देवानंद लोणारे, विलास वानखेडे, डॉ. ललित बोरकर, अरविंद दिवे, संग्राम कळणे, ज्योती बोरकर, संगीता कुंभारे, दशरथ रंगारी, गौतम ताकसांडे, नुपूर सूर, माधवी रामटेके, रंजना थुल, सरस्वती जोगळेकर यांसह सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी उपासक-उपासिकांनी पाली भाषा अध्ययनाचा ध्यास पुढेही कायम ठेवण्याचा संकल्प केला.

---

# आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था करमाळा आयोजित १२ वे मुळव्याध शिबिर यशस्वीपणे संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा - करमाळा तालुक्यातील जाधव-पाटील हॉस्पिटल व आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वे मुळव्याध संबंधी आरोग्य शिबिर आज रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी यशस्वीपणे पार पडले.या शिबिराचे मार्गदर्शन महाराष्ट्र राज्यातील मुळव्याध उपचार क्षेत्रातील नामवंत तज्ञ डॉ. प्रदीप तुपेरे व त्यांच्या डॉक्टरांच्या टीमकडून करण्यात आले. शिबिरात एकूण ६७ रुग्णांनी तपासणीसाठी सहभाग नोंदविला, तर काही रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सर्व तपासण्या व उपचार नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात आले.शिबिराचे आयोजन जाधव-पाटील हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. रोहन पाटील यांच्या पुढाकारातून करण्यात आले. या शिबिरासाठी हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचारी वर्गाने उत्कृष्ट सेवा पुरवली.शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिव अभिजित पाटील, डॉ. शिवानी पाटील, अजिंक्य पाटील,



तात्यासाहेब जाधव, महादेव भोसले, प्रमोद जगदाळे, राहुल जाधव, शितल पेटकर यांसह संपूर्ण टीमने मोलाचे योगदान दिले.कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. रोहन पाटील यांनी सांगितले की, आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रम सातत्याने राबवले जातील. अशा आरोग्य शिबिरांमुळे करमाळा तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळेल.

---

# दशश्री माळी हॉल येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे सर्वपक्षीय शोकसभा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल पालघर येथील दशश्री माळी हॉल येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेला विविध राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, माजी पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत नेत्यास श्रद्धांजली अर्पण केली.

या शोकसभेस राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), भारतीय जनता पक्ष, शिवसेना, काँग्रेस आदी सर्वच पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.यावेळी , दादांच्या जाण्याने आज राष्ट्रवादी काँग्रेसचा परिवार विस्कळीत झाला आहे. पक्षाचा आधार हरपला आहे. ज्या वेगाने आणि कर्तृत्वाने अजितदादांनी राष्ट्रवादी परिवार पुन्हा एकत्र आणण्याचे स्वप्न पाहिले होते, ते स्वप्न दुर्दैवाने अधुरेच राहिले, अशी भावनिक प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे पालघर जिल्हाध्यक्ष आनंदभाई ठाकूर यांनी व्यक्त केली. अजितदादा हे प्रशासनावर पकड असलेले, निर्णयक्षम आणि रोखठोक बोलणारे नेते होते, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष भरत राजपूत यांनी व्यक्त केले.तर शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे यांनी देवत्व प्राप्त झालेले नेतृत्व आपण गमावले असून ही न भरून येणारी



हानी आहे, अशा शब्दांत श्रद्धांजली वाहिली. या सर्वपक्षीय शोकसभेस राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आनंदभाई ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, नगराध्यक्ष राजेंद्र माच्छी, काँग्रेसचे सरचिटणीस सत्यम ठाकूर, माजी आमदार अमित घोडा, माजी नगराध्यक्ष मिहीर शहा, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष करण ठाकूर, माजी नगराध्यक्ष रवींद्र फाटक, समीर वैद्य, पांडुरंग बेलकर, विनायक बारी, हरेश मुकणे, जगदीश राजपूत, जिल्हाध्यक्ष रोहिणीताई शेलार, पंचायत समिती सदस्य स्वाती राऊत आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. तसेच नगरसेविका जिल्हाध्यक्ष कीर्ती मेहता, विपुल राऊत, तन्मय बारी, अमित नहार, हेमंत धर्ममेहेर, नगरसेवक शमी पीरा, सईद शेख, सुरेंद्र अण्णा पाटील, संतोष देशमुख, हितेंद्र पाटील, पिंकी नहार, विजय म्हात्रे, संजय पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती नोंदवली. शोकसभेदरम्यान उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी अजितदादांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. एकूणच ही सर्वपक्षीय शोकसभा अत्यंत शांत, गंभीर आणि भावनिक वातावरणात पार पडली.

# गांधी विचार संस्कार परीक्षेत डोंगऱ्यादेव माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरावर घवघवीत यश

## दोन विद्यार्थिनींना सुवर्णपदक; शाळेला स्मृतिचिन्ह देऊन गौरव

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तालुका विधायक समिती संचलित, कोकणीपाडा येथील श्री डोंगऱ्यादेव माध्यमिक विद्यालयाने गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित 'गांधी विचार संस्कार' परीक्षेत जिल्ह्यामध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थिनींनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

अहिंसा, प्रेम आणि शांततेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान नवीन पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते. यंदाच्या परीक्षेत डोंगऱ्यादेव विद्यालयाच्या सिमरन दिनेश वळवी आणि पूनम धनसिंग नाईक यांनी जिल्ह्यातून संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. केवळ प्रथमच नव्हे, तर द्वितीय आणि तृतीय क्रमांकावरही या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोहोर उमटवली आहे: द्वितीय क्रमांक (रौप्य पदक): दर्शना दिनेश नाईक, सोनल भावराम वळवी आणि वैष्णवी संदीप कोकणी. तृतीय क्रमांक (कांस्य पदक): ज्योती जितेंद्र वळवी आणि तनिषा रवींद्र नाईक. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल शाळेला विशेष स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. या परीक्षेचे यशस्वी नियोजन शाळेचे उपशिक्षक वसंत वळवी यांनी केले, तर मुख्याध्यापक राजेश गांगुर्डे व शिक्षक वृंदांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन आमदार चंद्रकांत रघुवंशी, व्हा. चेअरमन मनोज रघुवंशी, सचिव यशवंत पाटील व कार्यालयीन अधीक्षक पुष्पेंद्र रघुवंशी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी कडून पत्रकारितेचा सन्मान

## केजचे पत्रकार प्रदिप गायकवाड यांचा विशेष सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



बुलढाणा अर्बन को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल केज येथील पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे उपाध्यक्ष श्री.प्रदिप गायकवाड यांना विशेष 'सन्मानचिन्ह' देऊन गौरविण्यात आले.त्या अनुषंगाने जालना येथे सामाजिक क्षेत्रातील पत्रकारितेतील अशा विविध कामांबद्दल गुण गौरव बुलढाणा अर्बन को-आपक्रेडीट सोसायटी च्या वतीने आयोजित केला होता.एका विशेष कार्यक्रमात हा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी बुलढाणा अर्बन ला समर्थ साथ...! अशा शब्दांत गायकवाड यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.संस्थेचे संस्थापक आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.यावेळी बुलढाणा अर्बन को- आप क्रेडीट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री. राधेश्यामजी चांडक, विद्यमान अध्यक्ष श्री.डॉ. सुकेशजी झंवर आणि बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ.कोमलताई झंवर यांनी श्री.प्रदीप गायकवाड यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. बुलढाणा अर्बन को-आप क्रेडीट सोसायटी आपली सदैव ऋणी राहील, अशा भावना यावेळी संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.प्रदीप गायकवाड यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्रदिप गायकवाड यांनी आपल्या लेखणी च्या माध्यमातून केज परिसरातील विविध प्रश्न मांडण्या सोबतच सामाजिक संस्थांच्या कार्याला नेहमीच प्रसिद्धी दिली आहे.त्यांच्या या कार्याची दखल राज्याची नामांकित संस्था असलेल्या बुलढाणा अर्बन को-आप क्रेडीट सोसायटीने घेतल्याबद्दल पत्रकार बांधव,सामाजिक कार्यकर्ते आणि केज शहरामधील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# पुण्याच्या 'स्नेहछाया' परिवाराकडून गोटेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ मिळावे व त्यांच्या सुप्त स्वप्नांना नवे पंख मिळावेत,या उदात्त हेतूने पुणे येथील स्नेहछाया परिवार सामाजिक संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यातील व केज तालुक्यातील गोटेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाअंतर्गत गरजवंत विद्यार्थ्यांना वह्या,पेन, दप्तर तसेच इतर आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले.या मदती मुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून पालकांनी ही समाधान व्यक्त केले आहे.पुण्या सारख्या शहरी भागातून थेट बीडच्या दुष्काळी ग्रामीण भागात मदतीचा हात पुढे केल्याबद्दल स्नेहछाया परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. हा कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.यावेळी स्नेहछाया परिवाराचे संस्थापक अध्यक्ष श्री.दत्तात्रय इंगळे, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक व शिक्षक मोहिते सर, चव्हाण मॅडम व पवार सर यांची प्रमुख उपस्थिती होती.शिक्षकांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, अशा सामाजिक उपक्रमां मुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होते आणि समाज आपल्यासोबत आहे,ही भावना त्यांच्या मनात बळावते.या कार्यक्रमा साठी सम्यक विद्यार्थी आंदोलन व वंचित बहुजन आघाडीचे सक्रिय कार्यकर्ते अक्षय बचुटे गोटेगावकर यांनी विशेष पुढाकार घेतला.त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला सामाजिक चळवळीची दिशा मिळाली.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

स्नेहछाया परिवाराच्या या उपक्रमाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला असून, शहरापुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांपर्यंत पोहोचण्याचा संस्थेचा प्रयत्न कौतुकास्पद ठरला आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोटेगाव येथील ग्रामस्थ,शाळेचे कर्मचारी व स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

# साने गुरुजी निवासी विद्यालय केजच्या दोन विद्यार्थ्यांची इस्रो दौऱ्यासाठी निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**





केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालय केज शाळेतील कु.कांबळे ज्ञानेश्वरी धनंजय व चि. गणेशकर शिवराज लक्ष्मण या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय निवड परिक्षेत घवघवीत यश संपादन केले असून त्यांची इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) च्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.या अभ्यास दौऱ्यासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत संपूर्ण राज्यातून १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.यात साने गुरुजी निवासी विद्यालय केजचे दोन विद्यार्थी आहे.इस्रोच्या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांना उपग्रह तंत्रज्ञान,अंतराळ संशोधन,राकेट प्रक्षेपण प्रक्रिया तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड सर, उपाध्यक्ष राजेश कापसे सर,संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता गित्ते-कराड मॅडम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# हिमायत फाउंडेशनकडून अपघातग्रस्त इमाम शेख इसाक अहमद यांना ५०,०००ची आर्थिक मदत

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील डोंगरकिनी या गावातील अत्यंत गरीब परिस्थितीत राहणारे आणि एका मशिदीचे इमाम म्हणून सेवा देणारे शेख इसाक अहमद यांना गंभीर अपघातानंतर उपचारासाठी हिमायत फाउंडेशनकडून ५०,००० ची आर्थिक मदत देण्यात आली.शेख इसाक अहमद हे आपल्या नियमित आरोग्य तपासणीसाठी रुग्णालयात जात असताना, कमी दृष्टीमुळे त्यांचा अपघात झाला. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली, मात्र मधुमेहाच्या (साखरेच्या) पातळीत सतत चढ-उतार होत असल्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली नाही.शेख इसाक अहमद हे आपल्या कुटुंबातील एकमेव कमावते सदस्य असून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. उपचाराचा वाढता खर्च आणि उत्पन्नाचा स्रोत बंद झाल्यामुळे कुटुंबावर मोठे संकट ओढावले होते.ही बाब लक्षात येताच हिमायत फाउंडेशन, गेवराई यांनी सामाजिक बांधिलकी जपत शेख इसाक अहमद यांच्या कुटुंबाला ५०,००० ची आर्थिक मदत चेक स्वरुपी केली. या मदतीमुळे त्यांच्या उपचारासाठी आणि कुटुंबाच्या दैनंदिन गरजांसाठी मोठा आधार मिळाला आहे.हिमायत फाउंडेशनने याआधीही अनेक गरजू, गरीब आणि संकटग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला असून, भविष्यातही अशीच सामाजिक सेवा सुरू ठेवण्याचा निर्धार फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.यावेळी हिमायत फाउंडेशन चे अध्यक्ष मुफ्ती उमर कुरेशी, मौलाना ताहेर मक्की, मौलाना अब्दुल हकीम पाटोदा बदर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक सय्यद एजाज सर फाउंडेशन चे सचिव शेख मुजीब,लुकमान खान, अब्दुल खवी व गावातील जेष्ठ व तरून समाज बांधव उपस्थित होते.




# गरिबांच्या घरांवर डल्ला म्हणजे जनतेविरोधातील गुन्हा

## दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे-आदित्य दादा पाटील

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



केज नगरपंचायतीत पंतप्रधान आवास योजना (शहरी) अंतर्गत तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा गंभीर प्रकार चौकशी समितीच्या अहवालातून उघड झाला असून, या प्रकरणावर केज नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष आदित्य दादा पाटील यांनी तीव्र आणि विद्रोही भूमिका घेतली आहे.

गरिबांच्या घरांसाठी असलेली योजना काही मोजक्या भ्रष्ट लोकांसाठी कमाईचे साधन बनली आहे. हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून, गरिबांच्या हक्कांवरचा थेट डल्ला आहे. दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, असे स्पष्ट व ठाम स्टेटमेंट आदित्य दादा पाटील यांनी दिले.

चौकशी अहवालानुसार बनावट नोंदी, खोटी कागदपत्रे आणि संगणकीय हेराफेरी करून शेकडो पात्र लाभार्थ्यांना अद्याप संपूर्ण अनुदान न देता कागदोपत्री मात्र निधी पूर्णपणे उचलल्याचे समोर आले आहे. गरिबांचे घर अपूर्ण असताना सरकारी निधी गिळंकृत होणे ही प्रशासनाच्या अपयशाची ठळक कबुली असल्याचे बोलले जात आहे.

या संदर्भात आदित्य दादा पाटील म्हणाले, आमच्या कार्यकाळात गरिबांना प्रत्यक्ष घरे मिळाली. मात्र नंतरच्या काळात योजनाच लुटल्या गेल्या, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. दोषी अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून अपहाराची पूर्ण रक्कम लाभार्थ्यांना मिळाली पाहिजे. तसेच सर्व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा झाली पाहिजे.

पंतप्रधान आवास योजना ही गरिबांच्या जीवनात स्थैर्य आणण्यासाठी असलेली महत्त्वाची योजना असून, तिच्या निधीवरच डल्ला मारला जात असेल तर तो केवळ कायद्याचा नव्हे तर लोकशाही आणि सामाजिक न्यायाचा घात असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

या प्रकरणात अहवालानंतरही कारवाई न झाल्यास जनता गप्प बसणार नाही, असा इशाराही अप्रत्यक्षपणे आदित्य दादा पाटील यांच्या भूमिकेतून स्पष्ट होत आहे. आता सर्वांचे लक्ष शासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले असून, दोषींना वाचवले जाते की न्याय मिळतो, याचीच खरी कसोटी या प्रकरणातून लागणार आहे.

# धडगाव ग्रामीण भागात नेतृत्व विकास प्रकल्पांतर्गत विविध उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**



धडगाव तालुक्यातील आदिवासी ग्रामीण भागात महिलांचा ग्रामसभेतील सहभाग वाढवण्यासाठी एकता रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन, धडगाव व बास्को ग्रामीण विकास केंद्र, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या विलीड ( WE LEAD )महिला सक्षमीकरण व प्रभावी प्रशासनासाठी नेतृत्व विकास प्रकल्पाने आपले एक वर्ष यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे.भुजगाव, पालखा, चोंदवाडे बु., शेलकुवी, उमराणी बु. व आचपा या सहा ग्रामपंचायतमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला. महिला, पुरुष व युवक असा व्यापक लक्ष्य गट ठेवून स्थानिक स्वराज्य व्यवस्थेत लोकसहभाग वाढवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता.

प्रकल्पाच्या सुरुवातीस ग्रामसभांमध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प होता. पंचायत राज कायदा, त्र्यात्तर वी घटनादुरुस्ती व शासकीय योजनांविषयी माहितीचा अभाव, तसेच आत्मविश्वासाची कमतरता ही प्रमुख अडचण होती. विलीड ( (WE LEAD) प्रकल्पांतर्गत महिलांसाठी प्रशिक्षण, चर्चासत्रे व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. ग्रामसभा व महिला ग्रामसभेचे महत्त्व महिलांना समजावून सांगण्यात आले. महिलांच्या सहभागासाठी पुरुषांची भूमिका महत्त्वाची असल्याने पुरुषांसाठीही स्वतंत्र प्रशिक्षण घेण्यात आले. युवकांना ग्रामपंचायत व्यवस्था व लोकशाही प्रक्रियेबाबत जागरूक करण्यात आले. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण दिल्याने ग्रामसभांमधील उपस्थिती व सक्रियता वाढली. घरकुल योजना, फार्मर आयडी, उपजीविका संधी, सेंद्रिय शेती, शेळीपालन व पशुपालन यासह विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांना ऑनलाइन अर्ज व पाठपुराव्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जनजागृतीसाठी पथनाट्यांच्या माध्यमातून पंचायत राज कायदा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व ग्रामसभेतील सहभाग यावर जनसंवाद साधण्यात आल्याने गावपातळीवर सकारात्मक बदल दिसून येत आहेत. शेलकुवी ग्रामपंचायतीत प्रशिक्षणानंतर महिलांनी पुढाकार घेऊन महिला ग्रामसभा घेण्याची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायतीत पहिल्यांदाच महिला ग्रामसभा घेण्यात आली, हे प्रकल्पाचे महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे. एक वर्षाच्या कालावधीत (WE LEAD) विलीड प्रकल्पामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढून ग्रामविकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. भविष्यात हा उपक्रम अजून दोन वर्ष पर्यंत राबविण्यात येणार असल्याचे एकता फाउंडेशन च्या संचालक ज्योती पावरा, शिलेदार पावरा यांच्या वतीने सांगण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077